## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५.

### अधिसूचना

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३.**

क्रमांक सीआरसी २०२२/प्र. क्र.३७/कार्या.१२.—भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७ आणि कलम ८ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून; आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, मुंबई येथे अधिकारिता असलेल्या उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, याद्वारे घोषित करीत आहे की, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ पासून,—

(एक) उच्च न्यायालयाने नियुक्त केलेले सत्र न्यायाधीश हे, हिंगोलीच्या सत्र विभागाच्या सत्र न्यायालयाचे अध्यक्ष असतील;

(दोन) सत्र न्यायाधीश, परभणी हे, आत्तापर्यंत ते ज्याचा वापर करत होते त्या, हिंगोली सत्र विभागाच्या व वसमत सत्र विभागाच्या बाबतीतील, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (२०२३ चा ४६) या खालील कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ पासून बंद करतील; आणि

(तीन) सत्र न्यायाधीश, हिंगोली यांना, सत्र विभाग, वसमत कडील प्रकरणे स्वतः निकालात काढण्याचे, अथवा अधिकारिता असलेल्या इतर न्यायालयाकडे सोपविण्याचे, किंवा त्यांना योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, अतिरिक्त सत्र न्यायालय, हिंगोली याकडे सोपविण्याचे, अधिकार असतील.

IndiaCode

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विलास वसंत गायकवाड,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सह सचिव.

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Mantralaya , Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
Dated the 17th February, 2025.

*NOTIFICATION*

BHARTIYA NAGRIK SURAKSHA SANHITA, 2023.

No. CRC 2022/CR 37/Desk XII.—In exercise of the powers conferred by section 7 and 8 of the Bhartiya Nagrik Suraksha Sanhita, 2023 (46 of 2023), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in this behalf; and in partial modification of all earlier notifications issued in this behalf, the Government of Maharashtra, in consultation with the High Court of Judicature at Bombay, hereby, with effect from the 22nd February, 2025, declares that,—

(*i*) a Sessions Judge, appointed by the High Court shall preside over the Sessions Court for the Sessions Division of Hingoli.

(*ii*) the Sessions Judge, Parbhani shall cease to exercise any powers under the code of Bhartiya Nagrik Suraksha Sanhita, 2023 (46 of 2023) in respect of the Sessions Division of Hingoli and Sessions Division of Basmat, which he had hitherto exercised, with effect from the 22nd February, 2025, and

(*iii*) the Sessions Judge, Hingoli shall have the powers to withdraw unto himself cases from the Sessions Division, Basmat or to assign to another Court of jurisdiction, or to assign to the Additional Sessions Court, Hingoli, any such cases as he thinks fit.

IndiaCode

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS VASANT GAIKWAD,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.